म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

153

कं. बा.
१९

पा. १३ संवत १९०८

# सुंदर सगुणी,

हें

लहान पुस्तक,

## मे. बिनयामीन शिमशोन आष्टमकर,

यांनीं

मराठींत तयार करून,

## याकोब बिनयामीन दांडेकर

यांनीं

मुंबईमध्यें

“तेलंगूमित्र” छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

पुस्तक प्रकाशकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

---

इस्राएली सन ५६४८

इसवी सन १८८८

---

किंमत तीन आणे.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

Kushe K. B.

# सुंदर सगुणी.

हें

लहान पुस्तक,

मे. बिनयामीन शिमशोन आष्टमकर,

यांनीं

मराठींत तयार करून,

याकोब बिनयामीन दांडेकर

यांनीं

मुंबईमध्यें

"तेलंगूमित्र" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

पुस्तक प्रकाशकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

इस्राएली सन ५६४८

इसवी सन १८८८

किंमत तीन आणे.

मम प्रिय

# सौ० मातोश्री मिर्यामबाई आष्टमकर

आपण

माझ्या जन्मदिवसापासून मोठ्या मातृप्रेमानें

माझा प्रतिपाल करून

माझी जतन केली

आणि

गेल्या इसवी सन १८८९ च्या एप्रील महिन्यांत माझ्या

असाध्य आजारीपणाच्या वेळीं अहोरात्र जागरण करून

माझी जोगणुक केली

या तुमच्या अप्रातिम प्रेमाबद्दल मी तुमच्या

चरणीं मस्तक ठेवून

अत्यंत कृतज्ञ बुद्धीनें

**हें लहानसें पुस्तक,**

अत्यादरें अर्पण करितों.

पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे, ॥
दयामृत रसार्द्रधी न कुल कज्जलें त्या किटे ॥
प्रसाद पट झांकिती परि परा गुरूचे थिटे, ॥
म्हणुनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ॥ केका० ॥

बिनयामीन शिमशोन आष्टमकर,
पुस्तक कर्ता.

# प्रस्तावना.

—:o:—

दयाळू इंग्रेज सरकारचें राज्य या हिंदुस्थान देशांत झाल्यापासून मराठी भाषेस बरेंच उत्तेजन आलें आहे. परंतु दर वर्षी या देशांत जरी अनेक ग्रंथ प्रसिद्ध होतात तरी नीतिसंबंधी वाचकांचे मनावर चांगला ठसा उमटेल अशीं पुस्तकें बहुधा छापलीं जात नाहींत. असे उल्लेख अनेक विद्वान वर्तमानपत्रकर्त्यांनीं अनेक वेळां केले असल्याचें स्मरतें.

एथील एक प्रसिद्ध विद्वान निबंधकर्ते असें लिहितात कीं, "सामान्य नीतिपर पुस्तकांची फार अवश्यकता आहे. कांहीं लोकांत दुर्गुणाचें प्राबल्य वाढत चाललें आहे. ह्मणजे दुर्गुणांचे परिणाम किती भयंकर होतात, हें अगदीं थोडक्यांत सुरस गोष्टींनीं आणि दृष्टांतांनीं चांगल्या रीतीनें दर्शविलेलें असावें. * * * आमच्या मंडळीनें उद्योग मात्र केला पाहिजे आणि तो करणें हें त्यांचें अवश्य कर्तव्यकर्म आहे. तें जर ते करणार नाहींत आणि भलत्याच कामांत आपला वेळ व आपलें सामर्थ्य हीं खर्चतील तर ते परमेश्वराच्या दृष्टीनें अपराधी ठरतील ह्मणून त्यांनीं असें न करतां आपलें पवित्र कर्तव्यकर्म यथासांग करून कृतकृत्य व्हावें. हें त्यांस योग्य आहे" या सूचनेकडे लक्ष्य देऊन मी आपल्या अल्प श्रमानें ग्रंथावलोकन करून ही लहानशी गोष्ट रचली आहे. ती कितपत साधली आहे हें पाहणें माझ्या सुज्ञ वाचकांकडे सोंपतों.

**सुंदर सगुणी** ही एक सावकाराची कन्या असून ती वडीलाच्या संपत्तीच्या जोरावर येवढी फुगून गेली होती कीं, ती मनुष्यासच काय पण प्रत्यक्ष जग उत्पन्नकर्ता प्रभु परमेश्वर यासही तुच्छ मानूं लागली. हा तिच्या दुरभिमानाचा ताठा जाऊन ती शुद्धीवर येऊन कशी सद्गुणी झाली वगैरे चित्तवेधक हकिकत या लहानशा पुस्तकांत लिहिली आहे. ज्यांस देवानें लेकरें दिलीं असतील त्यांनीं या पुस्तकास आश्रय देऊन उत्तेजन द्यावें ही विनंति आहे.

माझें हें लहान पुस्तक केव्हांच छापून प्रसिद्ध झालें असतें, पण इसवी सन १८८९ सालीं अनेक कष्ट व असाध्य शरिरव्याधींनीं मला ग्रासून सोडलें होतें. त्या प्रसगीं मोठमोठाल्या प्रसिद्ध डाक्तरांनीं मी वांचण्याची आशा सोडली होती. त्या वेळीं माझी अत्यंत प्रिय माता, अतुल बंधु, व नम्र पत्नी यांनीं मजकरितां जे अतोनात कष्ट व प्रयत्न केले, त्यांस सर्व समर्थ परमेश्वरानं यशस्वी केलें ह्मणून मी त्या थोर जगदीशाचा व नजीक व दूर आप्त मित्र ज्यांनीं माझ्या कल्याणासाठीं श्रम करून सर्वसमर्थाची प्रार्थना केली त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहें.

पुढें मी बरा होऊन विचारांत पडलों होतों, इतक्यांत माझ्या शुभचिंतक मित्रांनीं हें पुस्तक प्रकाशीत करण्याचें मनावर घेतलें ही गोष्ट मला येथें आभारपूर्वक कळविली पाहिजे.

**बेंनजामिन सामसन आष्टमकर.**

# सुंदर सगुणी.

प्राचीन काळीं गंगानदीच्या काठीं **आनंदपुरी** या नांवाचें एक मोठें शहर वसलें होतें. त्या ठिकाणीं व्यापाराची भरभराटी असल्यामुळें तेथील सर्व लोक आपल्या आयुष्याचा काळ आनंदानें क्रमण करीत असत. गांवांत विस्तीर्ण रस्ते, भव्य इमारती, अनेक बागबगीचे, विपुल फलफळावळ व धान्यें, आणि स्वच्छ पाण्याचे कारंजे असल्या कारणानें कोणत्याहि गोष्टीची उणीव त्या ठिकाणीं नसे. त्या **आनंदपुरी** नगरीमध्यें **प्रियकांत** नांवाचा एक लोकप्रिय व धनाढ्य सावकार रहात असे. त्याची प्रिय पत्नी त्याच्याच प्रमाणें चतुर होती. ती सद्गुणसंपन्न असल्यामुळें सर्वांबरोबर सलोख्यानें वागे ह्मणून ती सर्वांस प्रिय झाली होती. व त्यामुळेंच तिला **प्रियशिला** हें नांव पडलें होतें. ती आपल्या प्रियकर भ्रताराच्या आज्ञेंत सतत निमग्न असे. तिची अतुल दातृत्वशक्ति, तिचा अति नम्र स्वभाव, तिचें पतीच्या ठायीं असलेलें पूज्य प्रेम वगैरे गुण पाहून **प्रियकांतास** आपण सर्वांपेक्षां सुखी आहों असें वाटे. तीं उभयतां शरीरसंपत्तीनें व धनसंपत्तीनें भाग्यवान होतीं इतकेंच नाहीं पण दयाळू **परमेश्वरानें** त्यांस एक अति लावण्य कन्यारत्नाहि देऊन सुखी केलें होतें. ती कन्या आईप्रमाणें रूपवति असून तिच्या मातापितरांनीं तिचें नांव '**सुंदर सगुणी**' ठेविलें होतें. तिचा मुखचंद्रमा पाहून आईबापांस अतिशय प्रेमानंद होत असे. तशांत ती त्यांची एकुलती एक कन्या असल्यामुळें तीस ते जिवापलीकडे जपत असत. अशी लावण्य व चतुर कन्या असल्यास कोणत्या मातापितरांस बरें आनंद होणार नाहीं! ती केवळ त्यांना जीवकाप्राण अशी झाली होती. **सुंदर सगुणीचे** आईबाप सुशिक्षित असल्यामुळें त्यांस विद्येचें महत्व चांगल्या रीतीनें समजत असे. ह्मणूनच त्यांनीं आपल्या मुलीस धर्मसंबंधीं

नीतीसंबंधीं आणि व्यवहार ह्मणजे गृहकृत्यासंबंधीं शिक्षण देण्यास मुळींच हयगय केली नाहीं. तीस सुशिक्षण देण्यासाठीं त्यांनीं हवा तितका पैसा खर्च करून विद्वान् शिक्षक ठेविले होते. त्यामुळें तिचा बराच अभ्यास झाला होता व त्या मुलीचें सौंदर्य पाहून पाहणारास ती बहुगुणी आहे असें वाटत असे. हें सर्व जरी खरें होतें तरी ती पडली अल्पवयस्क अबला. तिच्या अल्प विचारामुळें तिला एक दुर्गुण जडला होता. तेणेंकरून तिच्या त्या अवर्णणीय रूपास न्यूनत्व येऊन तिच्या गुणी स्वभावावर केवळ दोषाची छाया पडली होती.

प्रिय वाचक हो, एखाद्या छानदार कोमल तरूस जर भयंकर कीटक लागला तर त्याची काय बरें दशा होईल? त्याप्रमाणें या आपल्या सुंदर सगुणीवर दुरभिमान या निर्दय किड्यानें स्वारी केली. त्यानें ही रूपवति वेल बेधडक करंडण्याचा सपाटा चालविला. तेणेंकरून तिच्या मोहक गुणांचा लवकरच लोप होऊं लागला. धनवानाच्या लेंकरांच्या मनांत एकदां आपल्या वडीलां-च्या संपत्तीचें वेड शिरलें ह्मणजे तें एकाएकीं निघत नसतें, त्यांस इतर सर्व मनुष्यें तुच्छ वाटतात. जगांत आपणच कायते थोर, असा तोरा मिरविण्यास तीं मागें पुढें पाहत नाहींत, या प्रकारचें वारें सुंदर सगुणीच्या डोक्यांत शिरल्यावर मग काय विचारतां! ती कोणासही जुमानीतनाशी झाली. गरीब व भिक्षुक तीस यःकश्चित प्राणी वाटूं लागले, तिचा तो दुरभिमानाचा तोरा, तिच्या बोलण्याची गर्विष्ट शैली, व तिच्या आचरणाचा तो डौलदार दिमाख पाहून तिच्या आईबापांस परम खेद होऊं लागला व त्यांचें काळीज चिंतेनें तिळ तिळ तुटूं लागलें. त्यांस वारंवार वाटूं लागलें कीं, आपल्या अप्रतिम लाडानें आपल्या प्रिये कन्येस हा दुर्गुण जडला आहे; परंतु बिचारीं करतात काय! तिचें मन दुखविणें त्यांस महत संकट वाटत असे. प्रत्येक आई बापास आपलें लेंकरूं कंठमण्याप्रमाणें भासतें हें उघडच आहे. सुंदर सगुणीचें वय दहा अकरा वर्षांचें होतें. तेव्हां तीस

तिच्या सौंदर्याबरोबर जडलेला मिथ्याभिमान यथाकाळीं बोधामृतपानानें दूर करून टाकण्याचें धैर्य मातापितरांच्या अंगीं येईना. चिताग्निनें तीं विचारीं जरी पोळून गेलीं होतीं तरी त्यांस काय करावें हें सुचेनासें झालें. व **सुंदर सगुणीस** उपदेश करण्याची संधि केव्हां येईल याचा तीं विचार करीत होतीं. आतां लाडानें बिघडलेलें मूल किती वाईट निपजतें, व लेंकरांवर लाड केल्यामुळें किती कुटुंबांस दुःख सोसावें लागतें, वगैरे गोष्टी आमच्या प्रिय वाचकांस सांगण्याची येथें गरज दिसत नाहीं. तशांत **सुंदर सगुणी** पडली पोरीची जात. तिच्या आईबापांस तिचा दुरभिमान पाहून अतोनात दुःख होत असे.

खरोखर पाहिलें असतां **सुंदर सगुणी** ही जरी लाडानें इतकी बिघडली होती तरी तिचें अंतःकरण ममताळू होतें. विपुल संपत्तीमुळें स्वभावतः तिच्या अंगीं असलेल्या अमर्याद डौलाचें वर्चस्व असल्यामुळें कोणतीही गोष्ट तिच्या मर्जीविरुद्ध असली तरी तिचें महत्व ती कांहींच लक्षांत घेत नसे. तिचें वैभव व सौंदर्य यापुढें तिला सगळ्या वस्तु तृणवत् वाटत असत. एखाद्या वेळीं निराश्रित व दुःखित जनांस पाहून तिची दयार्द्र बुद्धि जागृत न होतां उलट तिची चित्तवृत्ति खवळत असे. जर एखादा वयोवृद्ध किंवा अति दीनावस्थेंत असलेला मनुष्य अथवा अनाथ पोरांची दुर्दैवी माता उदार आश्रयासाठीं तिच्या जवळ विनयपूर्वक आर्जव करी तेव्हां तीस पितृगृहीं भिक्षा वाढणारा जो अधिकारी असे त्याजकडे जाण्यास धमकावून सांगितलें ह्मणजे इला वाटत असें कीं आपण मोठें परोपकाराचें काम बजाविलें.

इकडे **प्रियकांताच्या** हातीं अमर्याद व्यापार असल्यामुळें त्यास दररोज अनेक कामें पहावीं लागत असत. तो आपल्या कारकिर्दींत सदां निमग्न असल्यामुळें त्याच्या घरीं मुलीचे हातून होणाऱ्या विलक्षण गोष्टी पहाण्यास त्यास अवकाशहि मिळत नसे. दुःखित व निराश्रित मनुष्यांसाठीं परोपकार बुद्धीनें जीं अगण्य कामें त्याच्या घरीं होत असत तीं चांगलीं साधावीं

ह्मणून आपली मुलगी **सुंदर सगुणी** दानाधिकाऱ्याकडे गरीब लोकांस पदोपदीं पाठवून देत आहे यामुळें आपल्या लौकिकास व परोपकाराच्या कामास ती मोठें सहाय्य करीत आहे असें वाटून तिची आई मोठ्या प्रेमानें तिची प्रशंसा करीत असे.

इकडे पहावें तर **सुंदर सगुणी** ही आपल्या डौलामध्यें गुंग असून जे कोणी गरीब लोक तिच्या बापाच्या घरीं वारंवार फेऱ्या घालीत असत, त्यांच्या बरोबर ती अगदीं तिरस्कार बुद्धीनें वागूं लागली इतकेंच नाहीं, पण जे थोर स्थितीचे लोक कांहीं कारणामुळें पेंचांत सांपडत असत, ते **प्रियकांताचा** सल्ला व मसलत घेण्यास त्याच्या दारापाशीं येत असत, त्यांस भेटण्याची संधि या अभिमानी मुलीच्या हट्टामुळें न सांपडतां ते विचारे निराश होऊन घरीं परत जात असत. त्या मुलीच्या हातून वारंवार अशा अविचाराच्या गोष्टी घडत आहेत. हें गाऱ्हाणें **प्रियकांताच्या** भेटीस येणाऱ्या गृहस्थांनीं त्याजपाशीं कांहीं भीति न बाळगितां केलें. **प्रियकांत** उदार मनाचा असल्यामुळें त्यास अशा गोष्टी ऐकून सहजच वाईट वाटलें. एके दिवशीं तो आपली प्रिय पत्नी **प्रियशिला** इजबरोबर कांहीं गृहसंबंधीं संभाषण करीत असतां आपल्या प्रिय कन्येच्या वर्तणुकीपासून आपणास अतिशय दुःख होत आहे असें कळवून तो एकदां असेंही ह्मणाला कीं, "हे प्रिये, आपण आपल्या मुलीचें नांव "**सुंदर सगुणी**" ठेविलें आहे तें अगदीं अयोग्य आहे. तिचे गुण तर मुळींच चांगले नाहींत. ती गरीब लोकांचा तिरस्कार, थोर लोकांचा अपमान, व चाकर माणसांचा धिःकार करीत आहे. अशा अलौकिकाच्या व निर्दयतेच्या गोष्टी आपल्या प्रिय कन्येच्या हातून व्हाव्या हें आपणास किती लाजिरवाणें आहे? तिचे दुर्गुण नाहींसे होऊन ती सद्गुणी होईल अशी संधि केव्हां तरी येईल काय? माझ्या मुलीला शुद्धीवर आणण्यासाठीं **जगदीश्वर** मला सहाय्य करो." पुढें, आईबापांनीं एकमत होऊन आपली मुलगी सुधारावी ह्मणून **सुंदर सगुणीस** प्रथम सभ्य रीतीनें सूचना केली परंतु या प्रेमळ सूचनेकडे तिनें दुर्लक्ष

केल्यामुळें तिच्या आईबापांनीं तीस सदाचारानें वागण्यास करडेपणानें व धमकीनें ताकीद दिली. पण ती लाडानें बिघडलेली पोर एकदांच कशी सुधारते! तीस आपल्या आईबापांच्या रागाचा कांहींच धाक वाटेना. ती उलट अशी ह्मणूं लागली कीं, ज्या आईबापांनीं मजवर ममतेचा निरंतर प्रलय करावा व ज्यांनीं आपणांस कधींहि धमकावूं नये त्यांनीं मला इतक्या उघड रीतीनें एवढी धमकी द्यावीना? कांहीं चिंता नाहीं! असें ह्मणून ती सुधारणा एकीकडे ठेवून रुष्ट झाली, एवढेंच नाहीं, परंतु ज्या प्रिय मातापितरांचा ती योग्य रीतीनें मानमरातब राखीत असे त्यांचा ती उघड रीतीनें अपमान करूं लागली. आपण आपल्या मुलीस सुधारण्यासाठीं जो उपाय हातीं घेतला होता तो निष्फळ झाला हें पाहून **प्रियकांतास** अतिशय वाईट वाटलें. यावेळीं त्यास समजूं लागलें कीं, आपल्या लाडामुळें आपल्या कन्येच्या पायाखालीं एक दुःखसागर पसरला आहे. तिचा या दुर्गुणामुळें घात होईल असें त्यांस वाटून अतोनात दुःख झालें. आतां, आपली मुलगी ताळ्यावर आणण्यासाठीं कोणता उपाय योजावा ह्मणून तीं विचारशील आईबापें निशिदिनीं मनन करूं लागलीं एकदां आईनें आपल्या कन्येस आपल्या जवळ बसवून तिला लडिवाळपणानें व आग्रहपूर्वक नितिसंबंधीं कांहीं बोधपर गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून **सुंदर सगुणीनें** आश्चर्यभरित होऊन आईस उत्तर केलें, "आईगे, कोणापासूनहि अशा प्रकारचा निषेध सोसून घेण्याची मला बाळपणापासून संवय नाहीं व जगांत कोणी कसें वागावें हें मला चांगल्या रीतीनें समजत आहे, करितां, मला कोणी शिकवावयास नको. मी आपल्या आचरणानें आपल्या सोबतीणीमध्येंच काय परंतु थोर पदवीच्या गृहस्थांच्या मुलींमध्यें केवळ अग्रगण्य बनून राहिलें आहें. आतां, माझ्या ज्या अभिमानामुळें तूं मला इतकें दूषण देत आहेस त्यावरून माझी खात्री होत आहे कीं, माझे तीर्थरूप श्रीमंत **प्रियकांत** याच्या घराण्याचें थोरपण कसें राखावें तें मला

चांगलें अवगत आहे. आईगे, मला कोणी आतां शिकवायाला नको." अशा प्रकारचें मुलीचें गर्वाचें भाषण ऐकून आई बिचारी चकित झाली व मुलीस काय उत्तर द्यावें हें तीस सुचेना. तिची चर्या पालटली, तिचा कंठ दाटून आला, व तिचे डोळे आसवांनीं भरून आले. तशीच ती गहिंवरयुक्त मुद्रेनें आपल्या प्रियपतीपाशीं जाऊन खळखळां रडली. तें पाहून **प्रियकांतानें प्रियशिलेचें** सांत्वन केलें. इकडे **सुंदर सगुणी** तर आपल्या मनांत ह्मणूं लागली कीं, माझ्याविषयीं आईबापांच्या मनांत माझ्या दुरभिमानाबद्दल जी शंका आली आहे ती व्यर्थ आहे. ती लागलीच आपल्या खोलींत एकटी जाऊन तेथील मोठ्या व स्वच्छ आरशांत आपलें मुखकमल पाहूं लागली व त्यांत तिनें आपलें अप्रातिम सौंदर्य पाहून ती मनांत ह्मणाली, "उत्पन्न झालेल्या कोणत्याहि प्राण्यास असा गुणसंपन्न रूपवान देह शरण जाणार नाहीं व ज्या परमेश्वरानें या माझ्या देहाच्या ठायीं इतके अलौकिक गुण मोठ्या संतोषानें उत्पन्न केले आहेत त्याचा सुद्धां हक्क आतां माझ्यावर मुळींच चालणार नाहीं अशी वल्गना करूं लागली. ती पडली मुलीची जात! तशांत दुरभिमान हा किती अनिष्ट आहे हें तिला काय ठाऊक!

श्लोक.

**॥ पर प्रोक्त गुणो वस्तु निर्गुणोपि गुणी भवेत ॥**
**॥ इंद्रोपिलघुतां याति स्वयं प्रख्याति तैर्गुणै ॥**

**अर्थः**–दुसऱ्यांनीं ज्याच्या गुणाची स्तुति केली तो पुरुष अल्पगुणी जरी असला तरी थोरवी पावतो. आणि इंद्र जर आपला थोरपणा आपले तोंडानें वर्णित आहे तर तो लघुता पावतो. "मनुष्याचा गर्व त्याला अधम करील परंतु जो नम्र तो गौरव पावेल" **नीति.** या सुशिक्षणाचें वारें **सुंदर सगुणेच्या** डोक्यांतही राहिलें नव्हतें. तीस वाटत असे कीं, जगामध्यें मीच काय ती ज्ञानी! दुसरे प्राणी कांहींच नाहींत. या जगांत सुखदुःखाची मिसळ आहे हें तिला कांहींच कळत नसे.

## अभंग

कई वहावें जीवन । कई पलंगीं शयन ॥
जैशी जैशी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ १ ॥
कई भोज्य नानापरी । कई कोरड्या भाकरी ॥
कई वैसावें वाहनीं । कई पायीं अनवाणी ॥ २ ॥
कई उत्तम प्रावर्णें । कई वसनें तीं जीर्णें ॥
कई सज्जनासीं संग । कई दुर्जनासीं योग ॥ ३ ॥
कई सकळे संपत्ति । कई विपत्ति भोगणें ॥
तुका ह्मणे सुखदुःख । तें समान जाण ॥ ४ ॥

आपणावर केव्हां व कसला प्रसंग येईल याचा नेम नाहीं, याचें ज्ञान तिला मुळींच नसे. एकुलत्या एका पोरीचा येवढा ताठरपणा पाहून **प्रियकांतास** व त्याच्या पत्नीस वारंवार दुःख होई मात्र. तरी आपल्या मुलीस सुधारण्याविषयीं त्याचें धैर्य खचलें नव्हतें. आपली मुलगी सुस्वभावाची होईल अशी त्यास पूर्ण आशा होती. त्यानें आपल्या प्रिय पत्नीस सांगितलें कीं "माझ्या प्रिय मुलीस सुधारण्याकरितां एक तरी संधि मग केव्हां तरी पण लौकरच सांपडेल; अशी माझी मनोदेवता मला सांगत असून ती मला निर्भय रहाण्याविषयीं आश्वासन देत आहे. असून आपली मुलगी अजाण (अप्रौढ) आहे. येवढ्यांत आपण निराश होऊं नये. आपणापाशीं असलेली विपुल संपत्ति व बाळपणापासून आपण केलेले तिचे लाड या दोन गोष्टींमुळें तिच्या अंगीं हा येवढा दुरभिमान जडला आहे. अशी माझी खात्री झाली आहे. मी क्रमाक्रमानें समयानुसार तिचे गुणदोष तिला दाखवून तिला शुद्धीवर आणण्याचा आजपासून दृढनिश्चय केला आहे. व मला खास वाटतें कीं, थोड्या काळानें माझी प्रिय मुलगीहि सद्गुणी होईल."

जरी **प्रीयकांता** जवळ अमर्याद द्रव्य होतें तरी तें बहुतक-रून जगाच्या निरनिराळ्या ठिकाणीं व्यापाराच्या कामीं आणि जीं

तारवें समुद्राच्या पृष्ठभागावर त्याच्या गुमास्त्याकडे हुकूम व माल घेऊन जात येत असत त्यांमध्यें गुंतलेलें होतें. अर्थात त्याच्या जवळ रोकड पैशाची रकम फारशी नव्हती.

एके दिवशीं प्रियकांतानें आपल्या मुलीस जवळ घेऊन तिला सुधारण्याच्या उद्देशानें तीस ह्मणाला कीं, "हे प्रिय कन्ये, पहा, माझा व्यापार जरी येवढा विस्तीर्ण आहे तरी माझ्या जवळ रोकड जमा कांहीं नाहीं; माझा सर्व पैसा सागराच्या पाठीवर व्यापाराचा माल घेऊन जाणारीं येणारीं तारवें यांत गुंतला आहे. प्रिय मुली, लक्ष्मी ही किती जरी स्थीर दिसली तरी ती चंचल आहे. ती क्षणामध्यें रावाचा रंक व रंकेचा राव करून सोडील ह्मणून तिजवर भरंसा ठेऊं नये कारण ह्मटलें आहे.

आर्या.

**देवें द्रव्य मिळालें, जरि तरि चित्तीं धरूं नये गर्व ॥**
**त्याचा काय भरंसा, जाईल बापा क्षणांत तें सर्व ॥ १ ॥**

हीं सर्व ईश्वरी सत्ता आहे. ईश्वर जर कृपा करील तर दरिद्रास राज्य देईल, आणि जर तो कोपेल तर राजास दरिद्री करील, तसाच क्षणांत धनवंतास निर्धन करील, आणि निर्धनास धनाढ्य करील असी सर्व कांहीं ईश्वरी सत्ता आहे." **धर्मपुस्तक.**

सर्व शक्तिमान, परमेश्वराची कृपादृष्टि, आपणावर पाहिजे. हे प्रिय कन्ये, ज्या संपत्तीविषयीं तू येवढी वल्गना करीत गर्वानें फुशारकी मारितेस ती सर्व संपत्ति या वेळीं समुद्राच्या लाटांच्या स्वाधीन आहे. जर तो अविश्वासु सागर वादळाच्या जोरानें खवळून जाईल तर एका क्षणामध्यें आपलें सर्व वित्त गिळंकृत करील मग आपली काय बरें स्थिति होईल? आपणास अगदीं दिनावस्था प्राप्त होणार नाहीं काय? असें असतां आपण या क्षणिक संपत्तीवर विश्वास ठेवून येवढा अडंबर कां बाळगावा? कोणावर केव्हां व कसला प्रसंग येईल याचा मुळींच नेम नाहीं ह्मणून प्रिय मुली आपण आतांशींच नम्रतेनें व गरिबीनें रहावें हें बरें.

आपल्या वडिलांचें असें उपदेशपर भाषण श्रवण करून **सुंदर सगुणीनें** लाडानें हंसून ह्मटलें; बाबा, असे निराशेचे विचार तुह्मी आपल्या मनांत मुळींच आणूं नका. निर्भय व निष्काळजी मनुष्याच्या घरीं लक्ष्मी अज्ञांकित दासीप्रमाणें हजर राहून त्यास साहाय्य करिते; तुह्मांस व्यापाराच्या कामीं गतकाळांत जो जय मिळाला आहे तो तुमच्या भावी काळाच्या जयाचें खास रक्षण करील. तुह्मांस भय बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं व ज्याप्रमाणें नद्या आपलें पाणी समुद्राकडे वेगानें नेतात त्याप्रमाणें तुमच्या आयुष्याच्या दिवसांत तुमच्या उत्कर्षा बरोबर तुह्मास सदोदित जय प्राप्त झालेला आहे ह्मणून तुमच्या घरची धन-संपत्ति व तुमच्या घरचें श्रेष्ठत्व यांस कोणत्याहि कारणानें कमी-पणा न येतां उलट तीं जास्त होत जातील. मग बाबा, तुह्मीं असें विपरीत भाषण कशासाठीं करतां बरें? माझ्या मतें तुमच्या सारख्या विजयी गृहस्थास हें मुळींच शोभत नाहीं."

या **सुंदर** मुलीचें बापाबरोबर होत असलेलें वरील भाषण संपलें नाहीं, तोंच कर्मधर्मसंयोगानें **प्रियकांताचा** विश्वासु मुनीम त्या ठिकाणीं कांहीं निरोप घेऊन आल्याचें त्यास समजलें. त्यास वर बलावतां त्याचें मुख अगदीं म्लान झालेलें, त्याचा चेहरा अगदीं फिकट, नेत्र पाण्यानें भरलेले, व तो दुःखानें घाबरलेला असा दिसला. त्याचा ऊर भरून आल्यामुळें कांहीं वेळ त्याच्यानें एकहि शब्द बोलवेना. **प्रियकांतास** वाटलें कीं, आपली मुलगी **सुंदर सगुणी** आपणापाशीं या वेळीं हजर आहे ह्मणूनच हा बोलावयास धजत नसेल **प्रियकांत** मायाकार त्यास ह्मणाला. "अहो मुनीमजी, तुह्मास काय बोलावयाचें असेल तें निःसंशय या वेळीं बोला. आजपासून मी माझ्या **सुंदर सगुणीस** ममलतींत घेतलें आहे. तिला माझ्या काराकिर्दीविषयीं आतां फार चांगलें समजूं लागलें आहे. काय सांगावयाचें असेल तें सांग पाहूं एकदां."

अर्थातच धन्याचा हुकूम झाल्यावरून त्या विश्वासू नौकरानें मोठ्या नम्रतेनें ह्मटलें "महाराज, मला फार वाईट वाटतें कीं, माझ्या कपाळीं तुह्मांस एक धोक्याचें वर्तमान कळवायाचें आलें आहे, मला आतांच अशी बातमी लागली आहे कीं आपला चीन एथील मोठा गुमास्ता जो तुमच्या आज्ञेवरून तिकडून लाखों रुपयांचें सोनें खरेदी करून आपल्या बंदरांत येण्याकारितां निघाला होता त्यानें मध्यांतरीं अविश्वासानें त्या तारवासह दुसऱ्या ठिकाणीं पोबारा केला आहे. हें अनर्थकारक व दुःखदर्शक वर्त्तमान चोंहीकडे प्रसिद्ध झालें आहे ह्मणून इतर ठिकाणचे तुमचे सर्व गुमास्ते बेइमान होऊन ह्मणूं लागले आहेत कीं, आतां **प्रियकांत** हा सर्वस्वी बुडाला आहे त्यास आह्मी जमाबंदीचा हिशोब देत नाहीं. त्याला पाहिजे तें त्यानें आमचें करावें! महाराज, याप्रमाणें जिकडे तिकडे अविश्वास व घोंटाळा झाला आहे. आतां काय करावें हें मला तर कांहीं सुचत नाहीं. आपली ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तण्यास हा आज्ञांकित सेवक तयार आहे."

प्रिय वाचकहो, जेव्हां असें अशुभ वर्तमान आपल्या **प्रियकांतास** समजलें तेव्हां त्याची मानसिक स्थिति कशी झाली असेल याचा विचार तुह्मींच करा. तो डगमगला तर नाहींच. कारण, तो मुळचा पडला धैर्यसागर, जरी आपण एका क्षणामध्यें दरिद्र दशा पावल्या माफक झालों आहों तरी सर्व गोष्टी ईश्वरकृपेनें व्यवस्थित होतील असें त्यांस वाटल्यामुळें तो आपल्या सेवकास ह्मणाला, "पहा, मी आतां लागलाच बाहेर गांवीं जातों. धन्याच्या नजरेवांचून हें काम ताळ्यावर येणार नाहीं. माझी तयारी करा व एक चांगलें तारूं पहा. ह्मणजे त्यांत बसून जलमार्गानें सर्व गुमास्त्यांकडे फेरी घालून कशी काय व्यवस्था आहे तें मी स्वतः जातीनें जाऊन पहातों. मला वाटतें कीं, माझे सर्व गुमास्ते फार प्रामाणिक व विश्वासू आहेत. ते ठकबाजी करतील असें मला दिसत नाहीं. तथापि न जाणो, द्रव्य आहे तें

कोणाची कधीं व कशी बुद्धि चकवील याचा नेम नाहीं. कारण ह्मटलें आहे, 'कनक आणि कांता ह्या मोहक वस्तु आहेत' तरी मला पाहिल्याबरोबर तें शुद्धीवर येऊन आपापला हिस्सा निःसंशय देतील अशी मला पूर्ण आशा आहे.

आतां आपले तारिरूप, जलाशयाच्या पृष्ठभागावर प्रवास करून आपणांस सोडून दूरच्या प्रदेशीं जाणार आहेत, असें **सुंदर सगुणच्या** लक्षांत आल्याबरोबर ती मोठ्या आवेशानें व गांभिर्यानें ह्मणाली, "बाबा, जर तुह्मी बाहेरगांवीं जाण्याचा दृढ निश्चय केलाच असेल, तर मीहि तुह्मा बरोबर येईन. बाबा, आपण मला नुकतेंच जलतत्वाच्या दगलबाजीविषयीं सांगितलें आहे. त्यामुळें माझ्या अंतःकरण-रूपी जमिनीवर जे अंकुर फुटले आहेत त्यांचे तरू होण्याचा संभव आहे. पहा, जो निर्दय सागर एका क्षणांत आमची विपुल संपत्ति गिळंकृत करूं शकतो तो पाषाणहृदयीं समुद्र तुह्मावर दयार्द्र दृष्टि करील काय? तुह्मी आतांच लक्ष्मीच्या चंचलपणावि-षयीं व जलतत्वाच्या अविश्वासूपणाविषयीं जें सांगितलें आहे; त्याचें स्मरण झालें ह्मणजे, बाबा, माझ्या सर्व शरीरावर कांटा येतो तर मीहि तुह्मा बरोबर निघतें. मलाहि घेऊन चला. (बा-पास साशंक पाहून) बाबा, मनांत कांहीं शंका आणूं नका. मी येतेंच तुम्हा बरोबर. मग कांहीं कां होईना तुमच्या बरोबर जाण्याचा मी अगदीं निश्चयच केला आहे."

**सुंदर सगुणीचें** पितृभक्ती विषयीं प्रेम पाहून कोणास बरें समाधान वाटणार नाहीं? तशांत **प्रियकांत** पडला तिचा बाप. आपली मुलगी शुद्धीवर येऊन तिनें आपला दुरभिमान सोडून द्यावा अशा चिंता समुद्रांत तो निशिदिनीं पडला होता, त्यानें त्या मुलीचें अप्रतीम प्रेमदर्शक शब्द ऐकल्या-बरोबर त्यास किती गहींवर आला असेल! त्याचा आनंद त्याच्या हृदयमंदिरीं मावेना. त्यानें आपल्या प्रिय कन्येस प्रेमानें उराशीं धरून मोठ्यानें ह्मटलें, " हे परम दयाळू, परमे-

श्वरा, जगन्नायका, विश्वपालका, जगदोद्धारा, मी आतां समजलों कीं, माझ्या **सुंदर सगुणीचें** अंतःकरण पाषाणमय नाहीं." ( मुलीकडे पाहून ) "हे माझ्या लाडके बाळा, ज्या अर्थी जगदीशानें तुझ्या धैर्याची व भक्तीची परीक्षा पाहण्याची संधि मला दिली आहे, त्या अर्थी ती मी व्यर्थ जाऊं देणार नाहीं. बाईगे, माझ्याबरोबर जाण्यासाठीं तूं ही तयारी कर. मी तुलाआपल्या बरोबर नेण्यास कबूल आहें."

इकडे **प्रियकांतानें** व तिकडे **सुंदर सगुणीनें** आपापली प्रवासास जाण्याची त्वरेनें तयारी चालविली. वाटेस लागणारी अन्नसामग्री आपल्या बरोबर घेतली. व **आनंदपुरी** जवळच्या बंदरांत एक चांगलें मोठें तारूं पाहून त्यांत जाण्याचें ठरलें. गलबतहि मोठें होतें. त्यास तीन डोलकाठ्या असून त्याचीं सगळीं शिडें अगदीं नवीं घनकोरीं होतीं. त्यावर सुमारें वीस खलाशी असून त्यांचा नायक नौकाविद्येंत त्याकाळीं मोठा हुशार होता. यदाकदाचित् दुर्दैवयोगानें एकादा दारुण प्रसंग आल्यास उतारू लोकांचा जीव वांचविण्याकरितां त्या तारवावर दोन मोठ्या होड्या ठेविल्या होत्या. सारांश त्या तारवांत पाहिजे त्यानें निर्भयतेनें प्रवास करावा असें तें मोठें होतें. अनेक शेटसावकार या महागिरींत दूरदूरचें जलप्रवास सुखरूपतेनें करीत असत व बहुतकरून याच कारणामुळें या तारवास "सलामती" हें नांव पडलें असावें. आपला कथानायक **प्रियकांत** आपल्या प्रिय कन्येसहवर्तमान या "सलामती" गलबतांत जाण्यासाठीं आपल्या कामकाजाची सर्व व्यवस्था करून व आपल्या विश्वासू मुनीमावर सर्व व्यापार सोंपवून पहांटेच्या समा पाहून निघाला. आपल्या प्रिय पतीस व कन्येस पोहोंचविण्या करितां **प्रियशिला** बंदरापर्यंत आपल्या दासीबरोबर गेली होती. बाप व मुलगी तारवांत बसल्या बरोबर नौकानायकानें तारूं हाकारिलें व **प्रियशिला** आपल्या पतीचा व कन्येचा निरोप घेऊन किनाऱ्यावर उभी होती. एक तर आपला जिवलग जन्माचा

सोबती प्रियपती व दुसरी आपल्या सर्व आनंदाचा ठेवा आपली प्रिय कन्या यांचा फार दिवसांनीं विरह झाल्यामुळें **प्रियशिलेस** किती दुःख झालें असेल याचा विचार प्रिय वाचकच करोत. किनाऱ्यापासून क्षितिजापर्यंत तारवाचीं शिडें दिसत तोंपर्यंत ती बिचारी एकसारखी स्फुंदत तेथेंच उभी होती व तिच्या सख्या व दासी तिचें सांत्वन करीतच होत्या. तिचा सर्व हवाला **ईश्वरावर** होता. त्यामुळें तिची मनोदेवता तीस सांगत असे कीं, "**प्रियशिले**, तूं मुळींच भय बाळगूं नकोस. तुझा भ्रतार व तुझी कन्या हीं उभयतां यशस्वी होऊन सुखरूप घरीं येतील." खरोखर ईश्वरेच्छेवर हवाला ठेवणाराचें धारिष्ट मोठेंच असतें. त्याप्रमाणें बिचारी सगुणी माता आपल्या सख्यांसहवर्तमान आपल्या घरीं गेली, व आपल्या प्रार्थनेच्या खोलींत जाऊन तिनें एकांतांत ईश्वरस्तुतीपर एक गीत गाईलें, व मोठ्या भक्तिभावानें देवाची प्रार्थना केली.

जलप्रवास करणारे जे लोक आहेत ते समुद्रांत किनाऱ्यापासून दूर गेले म्हणजे त्यांस वर आकाश व खालीं पाणी यावांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं. सर्व जग काय तें त्यांचें तारूं असें त्यांस त्या वेळीं भासतें. व त्यांस **ईश्वराचें** अफाट वैभव याची अपरंपार दया, त्याची अगाध चालक शक्ति, त्याचें अनुपम ज्ञान, हें फार चांगलें आठवतें व त्या थोर **देवाच्या** किंचित् अवकृपेनें आपणास जलसमाधी प्राप्त होण्याचा संभव आहे असें वाटल्यावरून दयासागराची करूणा प्रवासी लोक मोठ्या मनोभावानें भाकतात. याचा अनुभव आमच्या कित्येक प्रिय वाचकांस आलाच असेल. असो. आपल्या **प्रियकांताचें** "सलामती" नांवाचें तारूं प्रथम हळू हळू पण मागाहून सों सों करीत बराच वेळ तिराप्रमाणें एकसारखें चालूं लागलें, पण कांहीं तास गेल्यावर एकाएकीं समुद्र खवळला. लाटांवर लाटा एक सारख्या आदळूं लागल्या. व अंधारमय क्षितिजाजवळ ढग झालेले पाहून नावाडी लोक **इतके घाबरले कीं, त्यांस काय**

करावें हें कांहींच सुचेना. कारण मोठें तुफान होण्याचें त्यांस भीति पडली. अशा वेळीं आपल्या सुंदर सगुणीची काय स्थिति झाली असेल हें समजण्यास आमचे वाचक फारच उत्सुक झाले असतील यांत संदेह नाहीं. पण तिचे खरे विचार तीं दर्शविण्यापूर्वीच सागरामध्यें एक वेषधारी शांति झाली ह्मणजे थोड्याच काळाकरितां समुद्राचें खवळणें बंद झालें तुफानाचीं सर्व भयानक चिन्हें दूर झालीं, उसळलेल्या लाटा स्थिर झाल्या, तरी आपल्या वडीलांच्या गुमास्त्यानें अहितकारक जें वर्त्तमान घरीं कळविलें होतें त्याच्या चिंतेनें व सागराच्या खवळण्यामुळें तिला जें गुप्त भय वाटत असे त्यामुळें तिच्या एकांत अंतःकरणरूपी जमीनीवर अनेक विचाररूपी अंकूर फुटत पण जेव्हां जिकडे तिकडे दश दिशा शांत झाल्या आहेत आकाश व पृथ्वी यांचा विस्तार स्पष्ट रीतीनें दृष्टीस पडत आहे सर्व निर्भयता आहे, या गोष्टी अवलोकन करून जेव्हां तिच्या अंगीं धैर्य आलें त्यासमयीं ती आपल्या बापाजवळ येऊन ह्मणाली "बाबा, माझें बोलणें खरें होतें किंवा नाहीं सांगा पाहूं! तुमच्या मनाच्या थोरपणापुढें व दृढ निश्चयापुढें लक्ष्मीचें कांहींच चालणार नाहीं. ती तुमच्या अधिन आहे. तुह्मी धैर्यशाली आहां तसेंच हिम्मत धरून असा ह्मणजे ही लक्ष्मी निमूटपणें तुमच्या मागोमाग आलीच समजा. धैर्य हा एक विलक्षण गुण आहे तेवढा तुह्मी आपल्या सन्निध असूं द्या ह्मणजे झालें."

सदरील भाषण प्रियकांतानें श्रवण करून तो आपल्या मुलीस ह्मणाला, "हे माझ्या लाडके सुंदर सगुणे, तूं इतक्यांत आनंद मानूं नको. जलासारखीं जीं तत्वें आहेत त्यांवर मनुष्यांचा अधिकार मुळींच चालत नाहीं. तशांत हा सागर महा ठक आहे तो केव्हां खवळेल याचा भरंवसा नाहीं."

प्रियकांत हा शांत स्वभावाचा, धार्मिक व दृढ निश्चयी असल्यामुळें त्यास ईश्वरेच्छेनें आपली आवडती कन्या न सुधारतां उलट कठोर मनाची झाली यामुळें तो विचारसागरांत गटकळ

खाऊं लागला. व आपली मुलगी या ऐहिक संसाराच्या क्षणभंगुरतेविषयीं केव्हां सावध होईल व तिला शुद्धीवर आणण्यासाठीं काय उपाय योजावा या विवंचनेंत तो पडला असतां, एकाएकीं मेघांनीं दिनकरास आच्छादून टाकलें, त्यामुळें तो अदृश झाला आणि चोहोंकडे अंधःकार पसरला. विस्तृत लाटा वर येऊं लागल्या- 'सलामती' या बाजूनें व त्या बाजूनें एकदां पुढें व एकदां मागें अशी हालूं लागली व उतारूंचें धैर्य खचविण्याकरितांच जणूं गलबताच्या तक्तपोशिवर समुद्राचें पाणी येऊं लागलें! हा भयानक देखावा पाहून तरी सुंदर सगुणीनें कांहीं भय दाखवावयाचें होतें! पण ती धैर्यशाली मुलगी मुळींच न डगमगतां सुकाण्या जवळ कंबरेवर दोन्ही हात ठेवून उभी राहिली. तिनें आपल्या वेलबुट्टी साडीचा पदर मानेवरून घेऊन पोटाजवळ घट्ट खोंचला होता. व तिनें नागवेणी घातल्यामुळें तिच्या डोक्यांत हिरकण्या जडित असलेलीं शिरभूषणें फार चमकत होतीं. तिच्या त्या ताठ्यामुळें तीस असें वाटूं लागलें कीं तुफान कःपदार्थ आहे. तिच्या हावभावावरून प्रेक्षकांच्या हें लक्ष्यांत येई. प्रियकांतास तर पोटच्या मुलीचें असें अतर्क्य धारिष्ट पाहून मोठा आचंबा वाटला- तो तिला आग्रहपूर्वक जवळ येण्याविषयीं व खालीं बसण्याविषयीं सांगूं लागला. पण ती निष्ठूर कन्या आपल्या बापाचेंहि ऐकेना. इकडे तर लाटांचें पाणी जोरानें आंत येऊं लागल्यामुळें हिची उंच किंमतीची साडी क्षारोदकानें भिजून चिंब झाली. प्रखर विद्युल्लतेचा चकचकाट व भयंकर मेघगर्जनेचा गडगडाट होऊं लागल्यामुळें हवेमध्यें जोरानें प्रतिध्वनि होई. हा प्रकार पहातांच सर्व खलाशांनीं त्वरा करून तिन्हीं शिडें खालीं पाडलीं. व हा भयंकर प्रसंग परमेश्वरानें टाळावा ह्मणून ते मोठ्या भक्तिभावानें दोन्ही हात वर करून जगदीशाचा धांवा करूं लागले व सर्वांनीं- जेव्हां "सलामतीच्या" तक्तपोशीवर वांकून महतगांभिर्यानें नमन केलें तेव्हां पाहणारास असें वाटलें कीं, आपली सुंदर सगुणी ही केवळ देवी असून हे भोळसर भक्त नावाडी जणूं काय तिच्याच पायां

पडतात। विद्युल्लतेच्या प्रकाशामुळें ती तर जणूं काय देदीप्यमान मुगुटच ल्यालेली आहे असें वाटे.

परंतु या वेळीं तिच्या मनामध्यें एक प्रकारची भीति उत्पन्न झाली होती असें वाटतें. कारण जेव्हां तिच्या बापानें तिला हातीं धरून नावाडी लोकांच्या मंडळींत ओढून घेतलें तेव्हां ती आपल्या बापास ह्मणाली " बाबा, या भयंकर देखाव्याचा शेवट लौकरच होईल ना ! " बाप ह्मणाला, " प्रिय मुली, ज्याला तूं अशा प्रकारचा प्रश्न करावा असा इहलोकीं परमेश्वरावांचून दुसरा कोणी नाहीं, कारण हे आपल्या बरोबरचे मोठमोठाले शूर ज्यांच्या धैर्याविषयीं आपणास काडी मात्र शंका येणार नाहीं, असे कुशल व धाडसी नावाडी अति नम्र होऊन ज्या श्रेष्ट, थोर, दयासागराच्या हातीं सर्व सत्ता आहे त्यास कसे काकुळतीनें शरण जात आहेत हें पहा. त्याप्रमाणें बाईगे, तूं अति लीन होऊन त्या सर्वसमर्थ जगदोद्धारकास कां शरण जाऊं नयेस ? त्या भक्तवत्सल नावाड्यांनीं लावून दिलेला कित्ता तूं कां वरें घेत नाहींस? असें बोलत आहे इतक्यांत एक भयंकर ध्वनि ऐकूं आला. तेव्हां तारवावरील सर्व खलाशांनीं एकत्र आरोळी करून ह्मटलें 'तारवांत पाणी आलें, तारवांत पाणी आलें.' तें पाहून सर्व भयाभीत झाले व त्यांस वाटूं लागलें कीं, या अफाट जलामध्यें आपला आतां अंत होईल. असा गलबतावर अनिर्वाच्य गोंधळ होऊन गेला. जो तो आपापला प्राण वांचविण्याकरितां प्रयत्न करूं लागला. नौका नायकानें तर गलबतावरील होड्या खालीं सोडल्या. त्याही लाटांवर एकसारख्या आदळूं लागल्या. प्राण रक्षणार्थ दुसरें आतां कोणतेंच साधन नाहीं. ज्या कोणास आपणास त्या होड्यांत जागा मिळावी ह्मणून वाटलें त्यांनीं त्यांत पटापट उड्या मारल्या. ज्यांस त्यांत ठाव मिळाला नाहीं त्यांनीं तक्रार करून तारवावरील तक्ते पकडले पण तेही घेण्यासाठ कित्येकांस पुष्कळच झगडाझगडी करावी लागली. जे बळकट होते जे दुर्बळास झुगारून देत व त्यांच्या हातून कांहीं तरण्य

सारख्या वस्तू असल्यास त्या ते हिसकावून घेत. याप्रमाणें सर्वांची पांचावर धारण बसली.

वरील गडबडींत **सुंदर सगुणी** व तिचा पिता **प्रियकांत**, यांची तुटातुट झाली. बाप एकीकडे व मुलगी दुसरीकडे. अशा स्थितीमुळें प्रियकांत तर वेडयासारखा होऊन "**सुंदर सगुणे, सुंदर सगुणे,** प्रिय बाळे," अशा प्रेमपुरस्कर एकसारख्या हाका मारून जवळ असलेल्या लोकांसच मिठी मारूं लागला. तिकडे मुलगी, "अहो-बाबा, अहोबाबा, तुह्मी कोठें आहां? या पोटच्या मुलीबरोबर येवढें रुष्ट कां झालां आहां? जी मजवांचून आपणास क्षणभर सुद्धां चैन पडत नसे. ते तुह्मी ओ सुद्धां देत नाहीं. बाबा, तुमची **सुंदर सगुणी** प्रिय कन्या या होडींत सुरक्षीत आहे." अशी ती बोलत होती, पण दुसरे नावाडी व इतर लोक फारच आरडा आरड करूं लागल्यामुळें **सुंदर सगुणेचें** भाषण बापास ऐकूं जाईना, व त्याचें ओरडणें इच्या कानीं पोहोंचेना. प्रियकांत हा तर होडींत उडी टाकावयास गेला, त्या सरसा तो पाय निसटून पाण्यांत पडला. त्यास जरी फार चांगलें पोहतां येत होतें तरी अशा मसयीं त्याचें धैर्य खचलें. कारण, लाटांच्या जोरानें तो होडीपासून बराच दूर गेला. तो जेव्हां डोळे उघडून पाही तेव्हां त्यास असें दिसे कीं, **सुंदरसगुणी** एका होडींत सुखरूप बसलेली आहे. पुनः त्याला असें वाटे कीं, ती लाटांवर तरंगत आहे व तळीं जाऊन पुनः वर येत आहे म्हणून तीस धरावयास तो जोरानें पुढें पोंहत जाई. पुनः ती हातीं येत नाहीं असें वाटून आपला प्राण कसा तरी वांचवावा म्हणून धैर्य करून ज्या दिशेकडे त्याला होडी दिसत असे तेथें दोन हात मारून एकसारखा पोंहत व लांटा फांकीत गेला. एकदांचा तेथें पोहोंचून एका होडीचा आधार घेत होता, पण या वेळीं तो अगदींच घाबरलेला व शक्तीहीन झाल्यामुळें त्यास वर चढवलें नाहीं. त्याचें शरीर त्यास केवळ अवजड ओझ्याप्रमाणें भासूं लागलें. व थकल्यामुळें श्वास लागून तो गुदमरल्यासारखा होऊन पुनः खालीं पडला.

इतक्यांत वाऱ्याच्या एका मोठ्या सोसाट्याबरोबर पर्वतप्राय लाट येऊन तिनें ती होडी उलटून टाकिली. अर्थात आंतील सर्व मनुष्यांनीं एकदमच राम म्हटला. **सुंदर सगुणीनें** मोठ्यानें हंबरडा फोडून "बाबा धांवा, बाबा धावा" अशी हांक मारली यावेळेस पाण्यांत पडलेल्या लोकांची स्थिति कशी झाली असेल याचा विचार आमचे सुज्ञ वाचक करोत. कारण त्याचें वर्णन करण्याचें पुस्तककर्त्याचें धैर्य नाहीं. असो. आतां, आमच्या वाचकांस **प्रियकांत व सुंदर सगुणी** यांची काय दशा झाली हें समजण्याची मोठी उत्सुकता झाली असेल यांत संदेह नाहीं. या वेळीं एका धैर्यसागर नांवाच्या खलाशानें **सुंदर सगुणेचा** हात धरून तीस सारखें पोहत ओढीत नेलें. व तीस किनाऱ्यावर नेऊन सोडिलें. **सुंदर सगुणेनें** तर डोळे मिटले होते व खारें पाणी पोटांत गेल्यामुळें तिला भोंवळ सुटली होती. पाण्यांत कोणी आपला हात धरून आपणास ओढून नेत आहे असा तिला भास मात्र झाला. सुक्या जमिनीवर पडल्यावर ती बेशुद्ध होती तरी नेत्र उघडून डोळे गरकन फिरवून उघडमीट करीत असे. व दीनवाण्या मुद्रेनें मुख उघडून "अहो बाबा, अहो बाबा" असे शब्द उच्चारीत होती. पण तिला तेथें कोणीच दिसलें नाहीं. कारण ज्या खलाशानें तिला वांचविलें त्यानें आपल्या जिवावर उदार होऊन पुनः कोणास तरी वांचवावें या सदुद्देशानें पाण्यांत उडी टाकली, कर्मधर्मसंयोगानें या उदार नावाड्याच्या हातीं **सुंदर सगुणेचा** बापच आला. त्यानें त्याचा हात धरून पूर्वीं वांचविलेल्या मुलीपाशीं सुरक्षीत आणून त्यास सोडलें. हीच ती **सुंदर सगुणी** होय. पुढें त्यानें आणखी एक वार पाण्यांत उडी टाकली तो पुनः वर परत आला नाहीं कारण तो कोण एकाचा प्राण वांचविण्याचा प्रयत्न करीत असतां दांडग्या मनु ष्यानें त्याच्या कंबरेस जी कां घट्ट मिठी मारली त्यासरसे उभयतां जे तळाम गेले ते पुनः वर आले नाहींत असें वाट आमच्या वाचकांचें लक्ष्य आमच्या **प्रियकां**ताकडे व सुं

सगुणीकडे लागलें असेल यांत अगदीं संशय नाहीं. पित्यास व कन्येस एका गैरमाहीत किनाऱ्यावर वरील खलाशानें आणून ठेविलें होतें हें आह्मी मागेंच कळविलें आहे. कधींमधीं मुलगी व कधींमधीं बाप असे आपले डोळे उघडमिट करून परस्परांकडे पाहूं लागत. प्रथम बापास किंवा कन्येस जाग्यावरून उठण्याची शक्ति नव्हती नंतर **प्रियकांत** हा सावध होऊन बसला व आकाशाकडे आपले दोन्ही हस्त करून व डोळे मिटून सर्व समर्थ जगदीश्वराचे आभार मानूं लागला. तो ईश्वर प्रार्थनेंत इतका गर्क होऊन गेला होता कीं, बाजूस कन्या **सुंदर सगुणी** सावध होऊन उभी राहिली याचें भान सुद्धां त्यास त्या वेळीं नव्हतें. मुलीनें बापाच्या तोंडचें ईश्वरस्तोत्र श्रवण करून तो आपल्या प्रार्थनेच्या शेवटीं तथास्तु ह्मणून हात खालीं करून शांत राहतो इतक्यांत **सुंदर सगुणीनें** धांव ठोकून बापाच्या गळयास कडकडा मिठी मारिली व मोठ्यानें हंबरडा फोडून ह्मणाली, " अहो बाबा, मी आतां पूर्ण समजतें कीं, या अफाट विश्वाचा उत्पन्नकर्त्ता प्रभु **परमेश्वर**, जग चालक, सत्य, जीवंत, न्यायी, दयासागर, जगन्नायक, सगळ्यांच्या मायबाप एकच **देव** आहे. या जगांत त्याच्याच इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात; व केवळ त्याच थोर बापाच्या प्रसादानें आपले पाय या भूमीवर लागले आहेत. हे दयानिधे, विश्वपालका तुझ्या अपार ममतेबद्दल मी व माझे वडील तुझे अनन्यभावें उपकार मानितों अशी प्रार्थना करून कांहीं वेळ उभयतां स्तब्ध राहिलीं व मुलीनें बापाच्या गळयास मिठी मारलेले हात सोडून ह्मटलें कीं, " बाबा, आपण आतां जगदीशाचे तर आभार मानिले पण ज्यानें आपल्या प्राणाची परवा न करतां आपणास येथपर्यंत आणून ठेविलें त्या मायाळू गृहस्थाचे उपकार मानावे हें योग्य आहे. मुलीची सूचना बापास फार पसंत पडून तीं उभयतां त्या तारक खलाशास शोधूं लागलीं. इकडे तिकडे जाऊन पाहतात तों त्यांच्या वांचून त्या किनाऱ्यावर एकाहि मनुष्य दिसेना नाहीं. तेव्हां ज्या नावाड्यानें

आपला प्राण वांचविला, त्यानें आपल्या जीवाची आशा मुळींच न धरतां खवळलेल्या समुद्राच्या पर्वतप्राय लाटांत दुसऱ्याचा जीव वांचविण्याच्या उद्देशानें पुनः उडी टाकली असावी व कांहीं तरी अपघात होऊन त्याचा अंत झाला असावा असें त्यांस वाटलें.

आतां, ज्या ठिकाणीं कोणी मनुष्य नाहीं, जेथें अनेक जातीच्या वृक्षांची दाट गर्दी होऊन गेली आहे, ज्या अरण्यामध्यें वारा मोठ्यानें वाहूं लागला ह्मणजे भयंकर प्रतिध्वनि होत आहेत अशा ठिकाणीं या पिता कन्येची मानसिक स्थिति कशी झाली असेल हें आमच्या वाचकांस कळवायास नकोच. त्यांच्या मुखांतून दुःखोद्गार निघाल्या बरोबर त्यांस प्रतिध्वनी वांचून दुसरें उत्तर त्या भयाण ठिकाणीं कोठून मिळणार? जमिनीवर दृष्टि लावून पाहिलें, तर रानटी जनावरांचीं पावलें उमटलेली मात्र त्यांस दिसत असत. ज्यांचा प्राण महत्संकटानें खवळणाऱ्या समुद्राच्या पोटांतून वाचला त्यांचा आतां कोरड्या भूमीवर काय परीणाम होतो कोण जाणें असें सहज त्या अरण्याच्या देखाव्यावरून दिसण्यासारखें होतें. बिचाऱ्यांस जर क्षुधा लागली तर त्यांस अन्न कोठून मिळणार? तृषा भागविण्याकरितां समुद्राच्या कांठीं व निबिड अरण्यांत गोड पाणी कोठें मिळणार? तर आतां हीं अग्नींतून निघून फुफाट्यांत पडल्यासारखीं झालीं कीं नाहीं? आपणास आतां मृत्यु गांठील असें त्यांस पदोपदीं भासूं लागलें. व्याघ्रादिक मनुष्यभक्षक प्राणी आतां येऊन आपला प्राण घेतील कीं काय अशी त्यांस भीति पडली. बरें जर त्या दोघांस एकदांच मृत्यु येऊन त्यांचा अंत झाला तर बरें. कोणी कोणाचें दुःख तरी पाहणार नाहीं. व यमराजाच्या घरीं दया आहे असें तरी समजण्यांत येईल. नाहीं तर प्रथम मरावें कोणी आतां बापानें आपल्या प्रिय कन्येस एखाद्या क्रूर जनावरानें फाडतांना आपल्या डोळ्यानें पहावें किंवा आपला बचाव करण्यामध्यें आपल्या बापाचा प्राण जात आहे असें मुलीनें पहावें अशा विचारसागरांत बिचारीं गटंगळ्या खाऊं लागलीं. तरी उभयतांनीं

धैर्य धरून जगन्नायक प्रभू **परमेश्वर** याजवर हवाला ठेवून आप-णास त्या ठिकाणीं खावयास मधूर फळें व प्यावयास गोड पाणी मिळेल या आशेनें इकडे तिकडे हिंडूं लागलीं. भूक व तहान यांनीं पीडित मनुष्य किती म्लान दिसतो हें सांगावयास नको. तशांत हीं बिचारीं अशा स्थितींत भर उन्हांत फिरूं लागलीं मग काय विचारतां? प्रखर तापानें त्यांचे पाय होरपळले जाऊन त्यांवर फोड आले त्यामुळें तीं फारच कासावीस झालीं होतीं. **प्रियकांतास** तर पुढें चालवेनासें झालें व त्यास अति श्रम पडल्यामुळें मुर्छा येऊन तो तर खालीं पडला. त्याच्या मुखकमलावर पांडुर-पणाची छाया दिसूं लागली. व घटकेंत दोन घटकेंत प्राण सोडतो कीं काय अशी त्याची स्थिति झाली. पण या वेळीं **सुंदर सगुणीनें** आपलें धैर्य खचविलें नाहीं. तिनें हिंम्मत करून आपल्या पित्यास बऱ्याच अंतरावर ओढीत नेलें. दैवयोगानें तिच्या नजरेस जवळच एक निर्मळ पाण्याचा झरा पडला तो पाहून **सुंदर सगुणेस** फारच आनंद झाला. तिनें आपल्या हस्ताचा **द्रोण** करून थोडेंसें पाणी आपल्या बेशुद्ध झालेल्या पित्यास पाजिलें. तें त्याच्या पोटांत गेल्याबरोबर त्यास तें अमृताप्रमाणें वाटून लागलाच **गुण** आला; त्यानें आपले डोळे उघडले व मुलीस हाक मारिली. आपल्या दोन्ही पायांवर एकदम उभा राहिला व आपली तहान भागविण्याकरितां आपली लाडकी कन्या झऱ्याजवळ उभी आहे असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां तो लागलाच तिजकडे गेला व त्या झऱ्याजवळ त्यास उत्तम फळांनीं लादलेलीं झाडें दिसलीं. त्याजवरील फळें तोडून तीं उभयतांनीं खाऊन आपलें पोट भरून तीं तरुछायेखालीं विश्रांति घेत बसलीं. यावेळीं **सुंदर सगुणीचें** अंतःकरण एवढें गहींवरून आलें होतें कीं, तिनें आपल्या बापाच्या गळयास घट्ट मिठी मारून हंबरडा फोडून ती खळखळां रडूं लागली. ती बापास ह्मणाली, "बाबा, मला आतां सर्व अप-राधांची क्षमा करा. मी तुम्हांबरोबर व जग उत्पन्नकर्ता **परमेश्वर** या-जबरोबर अगदीं कृतघ्नतेनें वागलें आहें, आतां मी सावध होऊन

व शुद्धीवर येऊन तुह्मापाशीं व त्या थोर नगरीशांपाशीं क्षमा मागतें. बाबा, मला आतां खास समजलें आहे कीं, या जगांत सर्वसमर्थ, सर्वज्ञ, सर्वसाक्ष, सर्वव्यापक, सर्वश्रेष्ठ, राजांचा राजा दयानिधे, प्रभु परमेश्वर आहे. तो या विश्वाचा उत्पन्नकर्ता असून सर्व प्राण्यांचा रक्षक तोच आहे." "हे दयासागरा विश्व उत्पन्न कर्त्या, ज्या अर्थी तूं आह्मा पिता व कन्या यांस अद्यापपर्यंत सुरक्षीत ठेवून परस्परांस जवळ राखिलें त्याअर्थी माझी खातरी होते कीं, तुझ्या मनांत आमच्यासाठीं आणखी कांहीं आश्चर्य-कारक काम करवून तूं आह्मास जीवंत ठेवावें असें आहे. दीनदयाळा प्रभो, आतां पासून माझ्या धैर्याविषयीं व शक्तीविषयीं मी तुजपाशीं निरंतर प्रार्थना करीत जाईन. हे प्रभो, परमेश्वरा, तुजवरच मी आपला पूर्ण विश्वास ठेवीन. माझी प्रिय आई ही आह्मास लौकर भेटावी या मागण्याखेरीज दयाळू देवा, तुजपाशीं मागण्यासारखी या वेळीं दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. माझे पूर्वापराध मोठ्या नम्रतेनें आपल्या पदरीं घेऊन आपलें वर्तन सुधारण्याविषयीं आपलें राहिलेलें सर्व आयुष्य खर्चीन असें अश्वासन देतें. आणि ज्याअर्थी तूं माझ्या सद्गुणी आईबापा करितां मजवर एवढी दया केली आहेस त्याअर्थी मी सदासर्व-काळ त्यांस संतुष्ट ठेवून त्यांच्या समक्ष तुझ्या स्तुत्य व पवित्र नांवाचें गौरव करीन. हे दीन वत्सला दयासागरा, आह्मां सर्वांवर तुझी दया निरंतर असूं दे. तुझें गौरवयुक्त नांव ह्या त्रिभुवनांत मानिलें जावो. (असें ह्मणून) ती झाडाकडे वळून आनंदभरित होत्साती मोठ्याने ह्मणाली, हे वृक्षा. जे कोणी भुकेनें मृतप्राय झाले असतील, त्यांस तुझीं फळें आमच्या सारखींच वारंवार समाधान देतात. हे कृपा सिंधो, तूं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें अशीं फलद्रुप झाडें निर्मळ व स्थीर असे पाण्याचे झरे उत्पन्न केले आहेस तो तूं धन्य आहेस.'

पाषाणहृदयी, दुरभिमानानें फुगलेली, आईबापाच्या निषेधावद्दल रुष्ट होणारी, आपल्या सौंदर्याच्या व बापाच्या विपुल संपत्तीच्या दौलतींत तोरा मिरविणारी, थोर गृहस्थांचा मानभंग व गोरगरिबांस

नमान करणारी, लक्ष्मीच्या चंचलपणावर व सागराचे दगल-बाजीवर विश्वास न ठेवणारी, परमेश्वराची आपणावर सत्ता नाहीं अशी गर्वोक्ति करणारी, आपल्या पोटची कन्या सुंदर सगुणी अनुतापी अंतःकरणानें अति नम्र होऊन जगदीशाजवळ शरणांगत जाऊन अनन्यभावें प्रार्थना करून आपल्या अपराधांची क्षमा मागते हें पाहून त्या सहृदय अंतःकरणाच्या प्रियकांतास परम संतोष झाला. तो मध्यें मध्यें आपल्या मनांत आळीपाळीनें हंसे व रडे. मुलीची प्रार्थना आटोपल्यावर बापानें तिला आपल्या पोटाशीं धरून ह्मटलें " लाडके प्रियकन्ये, तुझा हा सुशील व नम्र स्वभाव पाहून मला अमर्याद आनंद झाला आहे. तुझ्यामध्यें एवढी अवर्णनीय सुधारणा पाहून तुझ्या प्रिय मातेस फारच संतोष होईल. परमेश्वर तुझें कल्याण करून तुला सुगुणानें वागण्याचें धैर्य देवो." नंतर उभयतां चार वाजण्याच्या सुमारास बंदर किनाऱ्यावर एखादें तारूं दृष्टीस पडतें कीं काय हें पाहण्याकरितां आलीं. तों दूर क्षितिजामध्यें एका तारवाचें शीड त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं बाप व मुलगी यांस अत्यानंद होऊन त्यांनीं वर आकाशाकडे हात करून जगदीशाचे आभार मानिले. दैवयोगानें तें तारूं क्रमानें पण वेगानें ज्या ठिकाणीं हीं उभयतां उभीं होतीं तिकडेसच येऊं लागलें. यावरून त्यांनीं असें अनुमान केलें कीं, वाऱ्याच्या सपाट्यानें सुंदर सगुणीच्या डोईवरील जो पदर वारंवार उडे तो तारवावरील खलशांनीं पाहिला असावा. व वसाहत नसलेल्या ठिकाणीं हीं मनुष्यें कोण वि कशीं आलीं हें पाहण्याकरितां कीं काय जणूं नौकानायकानें पहं गलबत इकडे फिरविलें असावें. तारूं अगदीं जवळ येऊन पोंपलें. तारवावरील एका मनुष्यास प्रियकांतानें चांगलें ओळखून मोठ्या आनंदानें ह्मटलें, "अरे, हा नौकानायक तर माझा विश्वासू रमाकर आहे." नौकानायकानेंहि त्यांस किनाऱ्यावर असतांनाच हा प्रियकांत व ती त्याची मुलगी सुंदर सगुणी आहे असें ओळखून त्यांस तारवावर आणावयास पाण्यांत होडी लोटली

व तींत स्वतः बसून त्यांस तो आणावयास त्वरेनें गेला. व लागलेंच त्यांस होडींत बसवून आपल्या गलबतावर घेऊन आपण त्यांच्याकरितां ताजें अन्न तयार करून आपल्या बरोबर आणलेलें गुणकारी औषध देऊन त्यांस हुशार केलें. आपली मोठ्या चमत्कारिक रीतीनें गांठ पडली ह्मणून नौकानायकानें व **प्रियकांतानें** देवाचे आभार मानिले. व **सुंदर सगुणेनें** तर आपल्या बापावर गुदरलेलें संकट त्यास निवेदन केलें. **प्रियकांतानें** आपल्या कन्येच्या पितृभक्तीविषयीं व धारिष्टाविषयीं सगळी हकीकत विदित केली. पुढें नौकानायकानें असें ह्मटलें कीं महाराज, आपलें तारूं बंदर सोडून गेलें नाहीं तों तुमचा चीन देशांतील गुमास्ता बंदरांत आला. व त्यानें हरवलेलें सर्व द्रव्य, सोनें, रुपें वगैरे त्यानें विश्वासूपणानें आणून दिलें.

सुमारें एक महिन्यानें **सुंदर सगुणेची** व तिच्या प्रिय आईची भेट होणार असी ईश्वरेच्छा होती असें दिसतें. कारण तेवढ्याच काळाच्या अंतरानें **सुंदर सगुणी** आपल्या बापासह **आनंदपुरी** नगरास येऊन सुखरूप पोंहचली. उत्कंठीत आई आपल्या मुलीस पाहिल्या बरोबर फार हर्षीत होऊन आपल्या कन्येस कडकडून भेटली व तिचे नेत्र आनंदाश्रूनें भरून आले. मुलीनें ही आईच्या गळ्यास घट्ट मिठी मारिली. **प्रियकांतानें** प्रियशिळेस ह्मटलें, "प्रिये, ही घे, तुझी लाडकी मुलगी **सुंदर सगुणी**, परम दयाळू **देवानें** आपली प्रार्थना मान्य केली आहे. खरोखर त्या जगदीशानें इस **सगुणी** बनविलें आहे."

आपल्या नवऱ्यास व कन्येस सुरक्षीत पाहून **प्रियशिलेस** जो आनंद झाला तो अवर्णनीय आहे. मुलीच्या आचरणामध्यें बराच सुधारा झाला असे आई मोठ्या आनंदानें पाहूं लागली. हलकट भाषण करण्यामध्यें किंवा व्यर्थ गप्पा झोंकण्यामध्यें तं आपला वेळ पूर्वीं व्यर्थ घालवीत असे, त्याप्रमाणें न करतां तं आतां दररोज कांहीं नवीन ज्ञान संपादनार्थ व नवे ग्रंथ अवलोकन करण्यांत घालवित असे. धर्मनीति, वैद्यकी, पाकशास्त्र शिवणकाम, कलाकौशल्य हे विषय तीस फार आवडूं लागले

त्यांचें अध्ययन करणें तीस मौज वाटत असे. आपणास उंच किंमतीचा पोषाख पाहिजे. मौल्यवान दागिणे पाहिनेत, गाड्यांतून फेरावयास पाहिजे, हा जो पूर्वी तिचा हट्ट असे तो सोडून ती साधी वस्त्रें परिधान करूं लागली. एखाद्या गरीब विधवेच्या किंवा पोरक्या पोरीचें अंग झांकण्यासाठीं नवीं वस्त्रें तयार करूं लागली. पूर्वी गरीब व भिक्षुक लोकांस ती एखाद्या वेळीं दानधर्मा धिकाऱ्याकडे उद्धटपणानें पाठवीत असे, पण आता त्यांच्या बरोबर ममतेचें भाषण करून त्यांची स्वतः मोठ्या कळवळ्यानें दाद घेऊं लागली. एकदां तिनें वस्त्रें रहीत कांहीं अनाथ लेकरांवर इतकी दया केली कीं, त्याजकरितां वस्त्रें स्वतः आपल्या हातांनीं शिवून व तीं त्यांच्या अंगांत घालून तीं लेकरें आपल्या आईबापाशीं नेऊन दाखविलीं त्या वेळीं आपल्या मुलीच्या औदार्याविषयीं तिच्या आईबापास जो आनंद झाला असेल त्याची कल्पना आमच्या प्रिय वाचकांनींच करावी.

"बापानें ह्मटलें हे परमेश्वरा. माझ्या मुलीवर माझी असलेली प्रीति व पितृवत ममता तुझ्याच प्रेमाचें फळ आहे. तुझ्या आशीर्वादा वांचून माझी ममता व काळजी ह्या सर्व व्यर्थ आहेत. कोमल तरूस आकाशांतील दहींवर मिळाल्यावांचून तो टवटवीत होणार नाहीं. हे देवा, सृष्टींतील सर्व प्राण्यांच्या गरजा तूं पुरवितोस. ज्या अरण्यांतील पक्षी व पुष्प यांस कोणती वाण पडूं देत नाहींस, तो तूं माझ्या कन्येस लाभाचा विभाग देण्यास विसरणार नाहींस. देवा, तुझ्यापाशीं मी धन मागत नाहीं, ऐष आराम मागत नाहीं. माझ्या कन्येस सर्वदां निरोगी शरीर, पवित्र अंतःकरण व सतत उद्योगी असण्यासाठीं बळ देण्यास तूं प्रसन्न हो. तिच्या इच्छा थोडक्या व चांगल्या असोत. व तीस दररोज मिळणाऱ्या अन्नाविषयीं समाधान वाटो व जगांतील मोहक मूर्खपणाच्या गोष्टी तिच्यापासून अगदीं दूर राहोत. हे प्रभो माझें अंतःकारण यशस्वी कर, ह्मणजे माझ्या मुलीस सन्मार्ग दाखविण्याचें, तीस सुशिक्षण देण्याचें चांगल्या व प्रामाणिक कामाकडे तिचें मन वळ-

विण्याचें सामर्थ्य मला प्राप्त होईल. सत्यता जाणण्याविषयीं ति ज्ञानचक्षू उघड, व सदाचारानें वागण्यास तीस धैर्य दे. तारुण्या च्या भयंकर मोहपाशापासून व दुष्ट मनोविकारांपासून ति रक्षण कर सोन्यापेक्षां ज्ञान प्राप्ति केवढी उत्तम आहे आ रुप्या पेक्षां बोध प्राप्ति केवढी वरीष्ट आहे. हे माझ्या वडिलां देवा, तीस सत्य मार्गानें चालण्यास धैर्य व शांति देऊन तुझी अ पाळन करण्याची तीस शक्ति दे, ह्मणजे जेव्हां तुझ्या परत येण्याविषयीं तुझें बोलावणें तीस होईल, तेव्हां ती तुझ्या पवित्र व धन्य अशी परतेल."

आईनें ह्मटलें " हे परमेश्वरा, मला मातृवत सुख देण्या षयीं जेव्हां तूं प्रसन्न झालास तेव्हां तूं या दासीकडे एक कर्त सोंपलें आहेस. हे देवा, तूं मला वाट दाखवीत व माझें मन व अ करण चांगुलपणानें प्रेरीत कर ह्मणजे मी तुझ्या इच्छेनु आपलें कर्तव्य कर्म बजावीन माझ्या हातून माझा कर्तव्यें व्हावी ह्मणून मला बुद्धि, दूर दृष्टि व योग्य धैर्य देऊन माझें मतीस कर. नाहीतर माझ्या कन्येवर माझी असेलली आं माया माझ्या खऱ्या हेतूकडे तीस न वळवितां माझ्या हातून कर्तव्य बरोबर घडून येणार नाहीं. जें पवित्र काम तूं म सोंपिलें आहेस तें तडीस नेण्याकरितां मी संतोषानें ज मुलाचा त्याग करण्यास तयार आहे. माझी कन्या ही तुझ्याकडून मिळालेली मौल्यवान देणगी आहे. तिचें ल करणें हें माझें समाधान आहे. ज्या कर्तव्याकडून ३ थोर आनंद प्राप्त होणार आहे अशी कर्तव्यें करावयास आज्ञा दे तुझी केवढी अमर्याद ममता आहे. अर्भक शरिराचे रो मातेचें मन काळजीनें व्यापून टाकतात तर माझ्या कन्येस मन वाईट विकारापासून ह्मणजे मानसिक घातक रोगांपासून राखण्याविषयीं मला केवढी जरूरी आहे? ह्मणून हे देवा, कन्येस सुशिक्षण देण्याविषयीं माझें दौर्बल्य नाहींसें कर. अपराधाविषयीं मला अंधत्व प्राप्त न होवो. तुझी आज्ञा

कारण्याचें सुशिक्षण देण्यास व तिला माझ्या ताब्यांत ठेवण्यास मला शक्ति दे. माझें आचरण शुद्ध व पवित्र असूं दे ह्मणजे माझ्या नीतीचा कित्ता ती गिरवील. हे **जगदीशा**, या नम्र दासीची प्रार्थना श्रवण करून माझ्या कन्येचें कल्याण कर."

उभयतां आईबापांनीं विश्वपाळकाची आराधना करून ह्मटलें, " हे दयानिधे, विश्वनिर्मित्या, आतां आमच्या कन्येस खरोखर **सुंदर सगुणी** हेंच नांव शोभतें. तूं केलेली सूचना आमच्या मुलीच्या मनांत चांगली ठसली आहे. तर देवा, ज्या कोणा मुली आमच्या **सुंदर सगुणेची** हाकिकत ऐकतील त्यांस ही आमच्या मुली प्रमाणें सगुणी होऊं दे. हीच आह्मा उभयतांची अनन्यभावें कर जोडून तुजपाशीं प्रार्थना आहे ती तुझ्यापुढें सादर होवो." तथास्तु.

## पद

धरूं नको अभिमान ॥
मनुजा करूं नको अभिमान ॥ धु० ॥
जग हें आहे सर्व अशास्वत ॥
विचार अंतरिं आण ॥ मनुजा ॥ १ ॥
धनदारादिक येथेंची राहती ॥
विद्या वैभव धाम ॥ मनुजा ॥ २ ॥
घेसि पदरिं जरि परहित करूनि ॥
पुण्य लभे तुला मान ॥ मनुजा ॥ ३ ॥
शरण रिघावें देवालागीं ॥
तोचि मित्र निदान ॥ मनुजा ॥ ४ ॥

# उपदेश.

सज्जनहो, स्वकष्टानें किंवा वडिलोपार्जीत संपत्ति आपणास प्राप्त झाली असतां आपण गर्वानें कदापि फुगूं नये. दुरभिमानानें पुष्काळांचा नाश होतो. या दुरभिमाना मुळें मोठाल्या राजलोकांस सुद्धां कारागृहवास सोसावा लागतो. मग इतर जनांची काय कथा? प्राचीन काळच्या ऐतिहासीक व जगांतील ठिकठिकाणच्या गोष्टी तर राहूं द्या एकीकडे पण, आर्वाचीन काळीं आपल्या देशाकडेसच पाहाना. मुंबई इलाख्यांतील एका बड्या व प्रसिद्ध संस्थानांतील राजास मद्रास शहरांत बंदींत रहावें लागलें व ब्रह्म देशाचा थिबा राजा तर आतां रत्नागिरीची हवा घेत बसला आहे. आमच्या या मुंबई शहरांत जें घराणें सुमारें पंचवीस वर्षांमागें इतकें धनाढ्य होतें कीं, त्याच्या प्रमुख पुरुषानें गर्वोक्ति करून ह्मणावें कीं, "ज्यों पर्यंत चंद्र सूर्य अस्थित्वांत आहेत तों पर्यंत आमच्या धन संपत्तीस कांहीं भय नाहीं." त्या घराण्यांतील अफाट धन या थोड्या काळांत नाहींसें होऊन त्या घराण्यांतील माणसांस आपलें उदर पोषण करण्या मारामार पडावीना? ज्या गृहस्थाच्या हातीं लक्षावधि रुपये खेळत होते, त्याचे ते पैसे जिकडे तिकडे फन्ना होऊन त्यांस त्यांच्या नौकरानें चर्म वाहानाचा प्रसाद मिळेल अशी धमकी द्यावीना? ज्या कुटूंबांतील मनुष्यांनी अश्व रथांत स्वारी केल्या वांचून घरांतून बाहेर पडूं नये त्यास पांघरण्यासाठीं वस्त्रें व पायांत घालण्यासाठीं जोडासुद्धां मिळूं नये ना? ज्याच्या कुटूंबांतील स्त्रि सुवर्ण भूषणांनीं हळदी सारख्या पिवळ्या धमक दिसून इतर लोकांच्या दृष्टीस सुद्धां पडूं नयेत त्यांनीं आतां दारिद्र दशा पा परकीय लोकांच्या घरीं नौकरी करावीना? अरेरे, काळाचें महा केवढें जबरदस्त हें! मला वाटतें कीं, ही सर्व निकृष्टदशा प्र होण्याचें मुख्य कारण धनापासून प्राप्त झालेला मिथ्याभिमान हो यासाठींच सुज्ञ लोकांचा बोध असा आहे कीं, आपणास लक्ष्मी प्र झाली असतां आपण आपलें खरें कर्तव्य विसरून जाऊन ग

पडूं नये. उद्यां आपली स्थिति कशी होईल याचा कांहीं भरंवसा नाहीं ह्मणून आपण फार सावधगीरीनें राहिलें पाहिजे. आपल्या हातीं पैसा आला ह्मणजे मोठ्या विचारानें त्याचा व्यय केला पाहिजे. कृपणा सारखें राहिल्यास सांठवलेलें द्रव्य भलत्याच्याच हातीं जाईल. मग तो त्याचा उपयोग कसा करील हे आपणास ठाऊक नाहीं. आपल्या हातून जेवढीं चांगलीं कामें करण्यांत येतील तेवढें बरें. स्वार्थाकडे दृष्टि पोंहचवून अर्थांध होऊं नये. परमार्थाकडें ही लक्ष्य दिलें पाहिजे. तरच आपण आपलें कर्तव्य बजाविलें असें होईल.

---

# पैशाचा उपयोग.

सुमारें एक शतका पूर्वीं एका विद्वानानें " पैशाचा उपयोग " या विषयावर एक उपदेशपर लेख लिहून ठेविला आहे. त्याच्या उपदेशाचा सारांश आमच्या प्रिय वाचकांसाठीं या ठिकाणीं देतों:—

सर्व ठिकाणचे. सर्व युगांचे, सर्व राष्ट्रांचे कवी, वक्ते व तत्वज्ञानीं यांनीं पैक्याच्या विरूद्ध वादविवाद केलेले आहेत. पण माझ्या मतें असें करणें बरोबर नाहीं. पैशावरील लोभ सर्व वाईट गोष्टींचें मूळ आहे. परंतु स्वतः पैसा तर तसा नाहीं. तो अपराध पैशाचा मुळींच नाहीं. पण त्याचा उपयोग करणारे जे आहेत त्यांच्याकडे तो दोष लागू आहे. सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत संसाराच्या सर्व गोष्टींमध्यें त्याचा अवर्णनीय उपयोग आहे. सर्व प्रकारचा व्यवहार करण्यास व सर्व प्रकारचीं चांगलीं कामें करण्यास पैसा हें मोल्यवान साधन आहे. तोच केवळ क्षुधितासाठीं अन्न, तृषितासाठीं पेय, नग्न मनुष्यास वस्त्र आहे. त्याचा उपयोग तर विधवेस पतीच्या ठिकाणीं व पोरक्यास बापाच्या ठिकाणीं होतो. त्याच्या योगानें आपण दुःखीत जनाचें संरक्षण करूं शकतों, रोग पीडित जनास अरोग्यतेचें साधन केवळ पैसाच होय. यम महाराजाच्या सदन द्वारांतुन ओढून काढण्यास बहुतकरून तोच समर्थ आहे. सर्वांस या बहुमोल्य पदार्थाचा खरा उपयोग कसा करावा हें मात्र ठाऊक असलें पाहिजे.

# नियम पहिला.

## तुमच्यानें जेवढें मिळवेल तेवढें मिळवा.

आपल्याच्यानें जेवढें द्रव्य मिळवेल तेवढें मिळवावें. परंतु ज्ञानें महाग दरानें खरीद करूं नये. त्याच्या योग्य किमतीपेक्षां आपण अधिक दाम देऊं नये. ज्या फायद्याच्या कामानें शरीर संपत्तीस इजा होण्याचें भय आहे, तसलें काम करण्याकडे आपलें मन वळवूं नये. भ्रष्टतेचें काम किंवा धंदा जो परमेश्वराच्या व देशाच्या नियमांविरुद्ध असेल त्यांमध्यें आपण हात घालूं नये. ज्या कामामध्यें लबाडी व ठकबाजी यांची गरज आहे तें काम मोठ्या गांभीर्यानें टाळ करावें. "आपल्याला जेवढें द्रव्य मिळवेल तेवढें मिळवावें" पण तसें करण्यांत आपण आपल्या शेजाऱ्यांचें कोणत्याहि प्रकारें नुकसान करूं नये. आपण त्याचें धन द्युत खेळून मिळवूं शकत नाहीं. आपल्या कामांत आपला उत्कर्ष होण्यासाठीं त्याच्या धंद्यांच्या मोड करूं नये. परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें आपल्या शेजाऱ्यांच्या अनीतीच्या किंवा उधळपटीच्या कामांत मुळींच माह्य करूं नये.

या सूचना लक्ष्यांत ठेवून तुमच्यानें जेवढें द्रव्य संपादन करवेल तेवढें करा. प्रामाणिक उद्योगानें तुमच्यानें जेवढें मिळवेल तेवढें मिळवा. तुमच्या धंद्यांत तुह्मी नेहमी उद्योगी असला पाहिजे. वेळ गमावूं नये. प्रत्येक उद्योगांत प्रत्येक दिवसास व प्रत्येक तासास तुह्मास काम असणारच. रिकामें राहणें उपयोगाचें नाहीं. तुह्मी चांगल्या उद्योगांत सतत निमग्न असलां ह्मणजे तुह्मास मूर्खपणाच्या व अनहिताच्या गोष्टी करावयास बनणारच नाहीं. अशा गोष्टी करावयास तुह्मास फुरसद कोठून सांपडणार? जें योग्य काम तुह्मी आपल्या हातीं घ्याल तें कराच करा. जितकें लौकर तुमच्यानें होईल तितकें लौकर करा. विलंब लावूं नका. आज नाहीं उद्यां, या तासाला नाहीं पुढल्या तासाला तें काम हातांत घेऊं असें ह्मणूं नका. जें तुम

रणानें आज करवेल तें उद्यांवर लोटूं नका. जेवढें लौकर होईल तेवढें लौकर करा. हातीं घेतलेल्या कामाविषयीं झोंप येऊं देऊं नका किंवा त्या संबंधानें जांभया देत बसूं नका. आपली सर्व शक्ति त्यासाठीं खर्ची. अंग चोरूं नये. कोणतेंही काम ढिला-ईनें आणि बेपर्वाईनें करूं नका.

जें तुह्मास संपादन करून घ्यावयाचें आहे त्याविषयीं सारा-सार विचार करा. परमेश्वरानें तुह्मास जें ज्ञान दिलें असेल तें सर्व तुह्मी आपल्या कामधंद्यांत खर्चा. फारच थोडे लोक याप्र-माणें चालतात हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें. अनेक लोक तर निरंतर आपल्या वाडवडीला प्रमाणेंच मंद बुद्धिनें वागतात. दुस-ऱ्यांच्या अनुभव ग्रंथामध्यें वाचून व डोळ्यांनीं पाहून व स्वतांच्या अनुभवाविषयीं विचार करून नेहेमी शिक्षण संपादन करून घेतलें पाहिजे. कालच्यापेक्षां आज तुह्मी अधिक ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. व सुशिक्षणाप्रमाणें तुमचें आचरणही शुद्ध ठेव-ण्याकडे तुमचें लक्ष्य नेहमी असूं दिलें पाहिजे.

---

# नियम दुसरा.

---

**तुमच्यानें जेवढा संग्रह करून ठेवतां येईल तेवढा तुह्मी करा.**

आपल्या मौल्यवान बुद्धीचातुर्याचा भाग मांसमय इच्छा तृप्त करण्याकडे किंवा कोणत्याही इंद्रियादिक क्रिडेकडे व्यय करूं नका. यावरून मी तुह्मास फक्त आधाशीपणानें खाणें व पिणें त्यज करा असें मात्र सांगतों इतकेंच समजूं नका. हें तर पाहिजे तो मनुष्य कबूल करील. पण ऐषआरामानें राहण्याची एक पद्धत आहे त्याप्रमाणें वागण्यास द्रव्य व्यय बराच करावा ला-गतो. ऐषआरामाचे पदार्थ आणि चित्र विचित्रतेचे पोशाख याचा कंटाळा करा. सृष्टी नियमाप्रमाणें आवश्य लागणाऱ्या साध्या गोष्टीमध्यें संतोष माना. केवळ डोळ्याचें पारणें पुरवि-

लावणींतला चुटका (रामजोशी).

रांडापोरें वंचक चोरें जंवर मिळवितां तंवर थवा]
शितें तंवर तीं भुतें भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा।
जोंवरि पैसा तोंवरि बैसा मंचकिं ह्मणति घ्याल हवा।
बेटाबेटी हातीं नरोटी देतिल हा खुप समज ठिवा॥

पद (शिवदीन).

बाईल पैशाची पैशाची विरळागत पुरुषाची॥ बाईल ध्रु०
धनकनकांतर गांठी त्याला समान सांगे गोष्टी॥१॥ बा०
नेसवि साडी लुगडीं त्यासी लावी ला.ी गोडी॥२॥ बा०
भ्रतार वेडा पिसा त्याशीं करी नित्य कर्कशा॥ बा०
शिवदीन गुरूचे पायीं पैशाविण कांहींच नाहीं॥ बा०

समाप्त.